REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख २८ ऑगस्ट, १९४० अंक ३५

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए. (कँटब), बार-ॲट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील ॲंड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहाहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
ग्रेट सोशल लाईफ ॲण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.
हेड ऑफिस—जळगांव, पू. खा.
एजन्सीकरितां आजच लिहा.
ब्रँच ऑफिस—लक्ष्मीरोड, पुणें.

पूर्ण स्वदेशी
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त
विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा, विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### विमा एजंटांचे लायसेन्स

नवीन विमा कायद्याप्रमाणें प्रत्येक विमा एजंटास लायसेन्स घेणें आवश्यक झालें आहे. ३१ मार्च, १९४० अखेर सबंद हिंदुस्थानांत मिळून सुमारें ५० हजार परवाने अशा रीतीनें देण्यांत आले. ह्यांपैकी ४४% परवाने बंगालमधून, २२% परवाने मुंबईमधून आणि १६% परवाने मद्रासमधून दिले गेले.

### मुंबई शहरांतला पाऊस

गेल्या आठवड्याच्या अखेरपर्यंत यंदाच्या पावसाळ्यांत मुंबई शहरांत एकूण ७८ इंच पाऊस झाला. मामुली प्रमाणापेक्षा हा आकडा सुमारें २५ इंचांनीं अधिक आहे.

### ब्रिटिश कामगारसंघाचें युद्धकर्जास सहाय

ग्रेटब्रिटनमधील कामगारांच्या संघांनीं ( ट्रेड युनिअन्स ) आजपर्यंत ब्रिटिश युद्धकर्जांत सुमारें एक कोटि रुपये बिनव्याजी घातले आहेत.

### इंग्लंड अमेरिकेंत विमानांचे कारखाने काढणार

अमेरिकेंत विमानांचे कारखाने काढण्याची एक योजना ब्रिटिश सरकारनें तयार केली असून तिची अंमलबजावणी लवकर होणार आहे.

### हिंदी व्यापारी जहाजांवर तोफांची तरतूद

हिंदी व्यापारी जहाजांवर पाणसुरुंगापासून बचाव करण्याचीं साधनें बसवण्यांत येत आहेत. त्यांच्यावर शत्रूचा प्रतिकार करण्यासाठी लहान तोफाहि बसवण्यांत येत आहेत.

### ट्रेझरी बिलांवर ११ आणे ४ पै व्याज

हिंदुस्थान सरकारचीं एक कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकण्यांत आलीं, त्यांवर सरासरीनें ११ आणे ४ पै इतका व्याजाचा दर पडला.

### हिंदुस्थान सरकारच्या खर्चांत बचत

१९३८–३९ सालाबाबतच्या हिंदुस्थान सरकारच्या खर्चाची छाननी पब्लिक अकौंटस कमिटीनें नुकतीच केली. खर्चाच्या ७६ बाबींपैकी ७३ बाबींवरच्या खर्चांत एकूण १ कोटि, २० लक्ष रुपयांची काटकसर झाली असल्याचें तिला आढळून आलें.

### वेड्यांचीं इस्पितळें

मुंबई प्रांतांत पांच ठिकाणीं वेड्यांचीं इस्पितळें असून त्यांत २,१८७ व्यथितांची सोय आहे. परंतु त्यापेक्षा ३८९ अधिक वेडे १९३९ सालीं इस्पितळांत ठेवून घ्यावे लागले. ७२ स्त्रियांची नवीन सोय ठाणें येथें लवकरच होईल. पुरुषांकरितांहि ९६ वेड्यांची आणखी सोय तेथेंच करण्यांत यावयाची आहे. १९३९ मध्यें ३३७ वेडे बरे झाले म्हणून सोडण्यांत आले. इस्पितळांतील व्यथितांच्या एकूण संख्येशीं त्याचें प्रमाण १३·६% पडलें. सर्व इस्पितळांत मिळून १६६ वेडे मरण पावले.

### ब्रिटिश चलनी नोटांच्या आयातीस बंदी

रिझर्व्ह बँकेच्या परवानगीवाचून, हिंदुस्थानांत बँक ऑफ इंग्लंडच्या नोटा बाहेरून आणण्यास सरकारनें आता बंदी केली आहे. फ्रान्स व शत्रुपक्षाच्या हातीं सांपडलेले इतर देश ह्यांत असलेल्या बँक ऑफ इंग्लंडच्या नोटांचा शत्रुपक्षास उपयोग होऊं नये, हा ह्या बंदीचा उद्देश आहे. ब्रह्मदेशांतून नोटा आणण्यास प्रत्यवाय नाहीं.

### बेल्जियम कौंगोमधील कपास

आफ्रिकेंतील बेल्जियम कौंगोमधील एका नवीन जातीच्या कपाशीची हिंदुस्थानांत आयात होण्याचा संभव आहे.

### बँकेच्या कामाचे तास

२ सप्टेंबर, १९४० पासून मुंबईच्या इंपीरिअल बँकेच्या कामाचे तास खालीलप्रमाणें असतील:—

शनिवारीं:—सकाळीं १०-३० ते दुपारीं १-३०
इतर दिवशीं:—सकाळीं १०-३० ते दुपारीं २-३०

क्लिअरिंगच्या वेळेच्या सोईचे दृष्टीनें हा बदल करण्यांत आला आहे. मुंबईतील इतर प्रमुख बँकांची कामाची वेळ खालीलप्रमाणें आहे:–

शनिवारीं:–सकाळीं १०–३० ते दुपारीं १–३०
इतर दिवशीं:—सकाळीं १०–३० ते दुपारीं ४.

### मद्रास सरकारचीं ट्रेझरी बिलें

हिंदी रिझर्व्ह बँकेनें मद्रास सरकारसाठी ५० लक्ष रुपयांच्या ट्रेझरी बिलांचीं टेंडरें मागविलीं आहेत. कमीत कमी २५ हजारांचें टेंडर पाठविलें पाहिजे. ३० ऑगस्ट रोजीं दुपारीं १ वाजणेच्या आंत टेंडरें रिझर्व्ह बँकेस पोंचलीं पाहिजेत.

### विमा पॉलिसींवर म्हैसूरची स्टँप ड्यूटी

म्हैसूर संस्थानाबाहेरील विमाकंपन्यांनीं त्या संस्थानांतील नागरिकांचे विमे उतरले, तर त्या विमा पॉलिसींस म्हैसूर सरकारचीं तिकिटें लावलीं पाहिजेत, असा म्हैसूर सरकारनें जाहीरनामा काढला आहे. ह्या प्रकारानें म्हैसूर सरकारास दरसाल सुमारें १० हजार रुपये स्टँप ड्यूटी मिळेल.

### बिगर-तिकीट प्रवास

तिकिटांशिवाय आगगाड्यांतून प्रवास करणारांचा बंदोबस्त करणारें एक बिल मध्यवर्ती असेंब्लीस सादर करण्यांत येणार आहे, असें समजतें.

### पाटणा येथें प्रदर्शन

बिहार कमर्शिअल म्यूझियमच्या विद्यमानें पाटणा येथें एक अखिल भारतीय औद्योगिक व शेतकी प्रदर्शन नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यांत भरविण्यांत येणार आहे.

### हिंद–जपान व्यापारी वाटाघाटी

हिंदुस्थान व जपान ह्यांचेमधील व्यापारी कराराच्या वाटाघाटी नोव्हेंबरपर्यंत बंद रहाणार, असें दिसतें. हिंदुस्थान सरकारच्या व्यापार–खात्यांतील अधिकाऱ्यांस तोंवर सवड होणार नाहीं असें समजतें.

### जमीनदारांचें युद्धसहाय

मुंबई प्रांतांतील जमीनदारांची एक खास सभा गेल्या आठवड्यांत गव्हर्नरांचे अध्यक्षतेखालीं भरली होती, त्यावेळीं जमीनदारांनीं २ लक्ष रुपये युद्ध-कर्जास, ४५ हजार रुपये युद्ध-फंडास व ९०० रुपये रेड क्रॉस फंडास दिले असल्याचें जाहीर करण्यांत आलें.

### नोटा लांबविण्याचा प्रकार

मुंबईतील कोट विभागांतील बँकांच्या गिऱ्हाइकांस लुबाडणारी एक टोळी आपल्या कामांत यश मिळवीत आहे. एखादा गिऱ्हाइक काउंटरवर नोटा मोजीत असला, म्हणजे टोळींतील एक इसम आपली स्वतःची नोट गिऱ्हाइकाचे पायाशीं टाकून त्याचें लक्ष तिकडे वेधतो. त्याचे साथीदार गिऱ्हाइकाच्या नोटा लांबवतात व नंतर गोंधळ माजतो तोंवर सर्व पसार होतात. पोस्टांतहि तिकिटें जमिनीवर मुद्दाम टाकून तेथील लोकांच्या नोटा, रजिस्टर करावयाचीं पाकिटें वगैरे अशाच रीतीनें लांबविलीं जातात. लोकांनीं ह्यापासून सावध रहावें.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४१० | वृत्तांचें नियंत्रण—पोर्ट ट्रस्टची घटना बदला—हिंदी लष्करी खर्च | |
| २ वाई तालुक्यांतील शेतीच्या धंद्याची पहाणी | ४११ | ५ दोन मृत्यू ... | ४१४ |
| ३ नवीन निघालेल्या नोटा | ४१२ | ६ हिंदी चलनाचा पाया मजबूत आहे ... | ४१५ |
| ४ स्फुट विचार ... | ४१३ | ७ सहकारी बँकांचे अहवाल | ४१७ |
| मि. चर्चिल ह्यांचें नमुनेदार भाषण—मुदतीच्या हुंड्या व मॉनिसरी नोटा ह्यांवरील स्टँप ड्यूटी—पिकांच्या उत्पा- | | ८ ठेव कीं कर्ज ! ... | ४१८ |
| | | ९ मुंबईच्या बाजारांतील घडामोडी ... | ४१९ |

# अर्थ

बुधवार, ता. २८ ऑगस्ट, १९४०

## वाई तालुक्यांतील शेतीच्या धंद्याची पहाणी*

### गोखले इन्स्टिट्यूटचें महत्वाचें आर्थिक संशोधन

येथील भारत सेवक समाजास जोडलेल्या आणि कै. वा. रावबहादुर काळे ह्यांच्या राष्ट्रहितप्रेममूलक औदार्याचे योगानें स्थापन झालेल्या व चाललेल्या गोखले इंस्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स ह्या संस्थेचे डायरेक्टर, प्रि. धनंजयराव गाडगीळ, ह्यांच्या नेतृत्वाखाली आर्थिक संशोधनाचें उपयुक्त कार्य अव्याहत चालू आहे हें सुप्रसिद्धच आहे. या इंस्टिट्यूटच्या विद्यमानें आजवर अनेक महत्त्वाच्या विषयांवर संशोधनात्मक आणि माहितीनें भरलेलें लिखाण प्रसिद्ध झालें आहे. विशिष्ट टापूंतील शेतीच्या आर्थिक परिस्थितीसंबंधानें शास्त्रीय पद्धतीनें पहाणी करून तीमध्यें उपलब्ध झालेली माहिती व्यवस्थित व उद्बोधक रीतीनें मांडण्याचें कार्य अलीकडे प्रि. गाडगीळ ह्यांनीं हातीं घेतलें होतें आणि तें उत्कृष्ट रीतीनें पुरें केलें असल्याचें आतां त्यांच्या प्रस्तुत परीक्षणविषयक पुस्तकांत आढळतें. शेतीच्या धंद्यांत तो चालवणारास काय उत्पन्न येतें आणि खर्चवेच जातां काय नफा उरतो हा विषय अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. शेतीची सुधारणा होऊन शेतकरी वर्गाची मिळकत वाढावी आणि राष्ट्राचें आर्थिक उन्नतीच्या मार्गांत पाउल पुढें पडावें ह्यासाठी देशाच्या निरनिराळ्या भागांतील पिकें काढणाऱ्या कुटुंबांच्या व्यवसायाची आणि त्याच्या ताळेबंदांतील भिन्नभिन्न बाबींची छाननी होणें अगत्याचें आहे. हें काम खर्चाचें व वेळाचें आहे. तसेंच, तें शास्त्रशुद्ध पद्धतीनें व काळजीकाट्यानें केलें जाण्याचें विशेष महत्व आहे. ह्या दृष्टीनें विचार करतां प्रि. धनंजयराव ह्यांनीं वाई तालुक्यांतील एका टापूमधील खेड्यांमध्यें आर्थिक पहाणी स्वतःच्या देखरेखीखालीं करून तीमधून निघणारी अनुमानें प्रसिद्ध केलीं आहेत ह्याबद्दल त्यांचें व त्यांच्या सहकाऱ्यांचें अभिनंदन केलें पाहिजे.

* "A Survey of Farm Business in Wai Taluka"—लेखक प्रि. डी. आर. गाडगीळ आणि श्री. व्ही. आर. गाडगीळ. किं. २ रु. ८ आणे.

प्रस्तुत पहाणीचें काम अडीच वर्षें चालून तिला सतरा हजार रुपये खर्च झाला. इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें ह्या कार्यास द्रव्यसहाय दिलें तें सत्कारणीं लागलें आहे. पंचवीस-तीस खेडेगावांत तपशीलवार माहिती एकाच वेळीं गोळा करणें, तिची पद्धतशीर मांडणी करून, तिच्यावरून निश्चित अनुमानें काढणें हा आर्थिक पहाणीचा एक महत्त्वाचा प्रयोग होता. ज्यांच्या व्यवसायाच्या तपशिलांची माहिती गोळा करावयाची त्या शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करणें हें सोपें काम नसतें. योग्य प्रचार करून प्रि. गाडगीळ ह्यांनीं ह्या कामीं यश मिळवलें. त्याच प्रमाणें माहिती गोळा करावयास नेमावयाचीं माणसें शिकवून तयार करावीं लागतात. हेंहि वेळाचें आणि अवघड काम असतें. वाई तालुक्यांतील निवडक टापूमध्यें करण्यांत आलेली प्रस्तुत आर्थिक पहाणी प्रयोगात्मक होती असें म्हणण्याचें कारण हें कीं ह्या प्रकारची चौकशी व अभ्यास हीं पाश्चात्य देशांत परिचयाचीं असलीं तरी सदरहु पद्धति हिंदुस्थानाच्या विशिष्ट परिस्थितींत कितीशी व्यावहारिक व उपयुक्त ठरेल ह्याविषयीं शंका होती. ह्या प्रकारची पहाणी इकडे करावयाचीच तर पाश्चात्य देशांत रूढ झालेल्या योजनेंत स्थानिक अडचणींच्या दृष्टीनें कांहीं फेरफार करणें आवश्यक आहे कीं काय हें निश्चित व्हावयास हवें असतें.

शेतकरी कुटुंबांच्या व्यवसायाची माहिती गोळा करून तिच्यावरून ह्या उद्योगांत त्यांस नफा उरतो कीं काय व उरल्यास तो किती उरतो हें ठरवण्याची मामुली पद्धति म्हटली म्हणजे निवडक खेड्यांतील प्रत्येक शेतावर होणारा खर्च व मिळणारें उत्पन्न ह्यांचा हिशेब तयार करणें ही होय. कांहीं शेतकऱ्यांच्या उद्योगाची अगदी बारीक सारीक माहिती काढून तिच्यावरून शक्य तेवढीं बिनचुक अनुमानें बनवणें हा सदरहु पद्धतीचा उद्देश असतो आणि तिला खर्चाच्या हिशेबाची पद्धति असें म्हणतात. प्रि. धनंजयराव ह्यांनीं उपयोगांत आणलेली योजना तिच्याहून भिन्न असून ती विस्तृत क्षेत्रांत केलेल्या पहाणीच्या स्वरूपाची आहे. तिचा हेतु कांहीं थोड्या शेतवाड्यांच्या तपशिलांत शिरण्याचा नसून एखाद्या टापूमधील ज्यास्तींत ज्यास्त शेतवाड्यांची माहिती काढून तीवरून त्यांचें सर्वसाधारण आर्थिक चित्र रंगवणें हा असतो. हिंदी शेतकरी स्वतःचे हिशेब ठेवीत नाहीं आणि ठेवूं शकत नाहीं. तेव्हां त्याच्या आर्थिक स्थितीचा तपशीलवार अभ्यास करणें हें जिकीरीचें व भयंकर खर्चाचें काम आहे. ह्या परिस्थितींत प्रि. गाडगीळ ह्यांनीं उपयोगिलेल्या पद्धतीचा अंगिकार करणें हेंच व्यावहारिक दृष्ट्या श्रेयस्कर होय. हिंदुस्थानांतील शेतीच्या व्यवसायाचें आर्थिक संशोधन त्याच्या प्रगतीच्या उद्देशानें व्हावयाचें असेल तर ह्या "पहाणी पद्धती"चा अवलंब केला पाहिजे. ह्या सिद्धांताची सत्यता प्रि. धनंजयराव ह्यांच्या प्रस्तुत पुस्तकांतील माहितीवरून आणि विवेचनावरून पटण्यासारखी आहे.

ह्या लेखांत प्रि. गाडगीळ ह्यांच्या पहाणीमधून निघालेल्या अनुमानांची माहिती देऊन तिचें विवेचन करणें शक्य नाहीं. त्यांनीं केलेल्या पहाणीच्या स्वरूपाचा परिचय करून देणें इतकेंच येथें करतां येईल. वाई तालुक्यांतील टापू हातीं घेण्यापूर्वी त्यांनीं पहाणी पद्धतीचा व "नमुना पद्धती"चा प्रयोग लहान प्रमाणावर केला होता आणि त्यांतील अनुभवाच्या आधारावर प्रस्तुत पहाणी करण्यांत आली आहे. परीक्षण विषयक ग्रंथांत पहिल्या भागांत प्रो. धनंजयराव ह्यांनीं आपण अंगिकारलेल्या पद्धतीच्या स्वरुपाची

माहिती दिली आहे. पहाणीचें क्षेत्र, खेडीं आणि शेतवाड्या ह्यांच्या नमुन्यांची निवड कोणत्या तत्त्वावर केली आणि माहिती मिळवण्यासाठी माणसें कशीं तयार केलीं इत्यादि बाबतींतला वृत्तांत बोधप्रद आहे. शेतकऱ्यांकडून त्यांच्या व्यवहारांसंबंधांत विश्वसनीय माहिती काढणें अवघड असतें आणि ती काढणारांस मोठ्या कौशल्यानें व काळजीनें आपलें काम करावें लागतें. गोळा केलेली माहिती विश्वसनीय आहे ह्याविषयीं खात्री होण्यासाठी तिला निरनिराळ्या प्रकारचे कस लावावे लागतात. ते लावले आणि चौकशींत विशेष खबरदारी बाळगली म्हणजे मिळालेली माहिती विश्वसनीय होते आणि ही पद्धति हिंदुस्थानासारख्या देशांत स्वस्त व सोयीची आणि म्हणून अपरिहार्य आहे असें प्रि. गाडगीळ ह्यांचें म्हणणें आहे. त्यांनीं आपल्या पद्धतीचें वर्णन केलें आहे त्याचें अभ्यासकांनीं अवश्य काळजीपूर्वक परिशीलन केलें पाहिजे. पाश्चात्य देशांतील पहाणी पद्धतीस आमचेकडे मुरड घालणें आणि तीमध्यें कित्येक बदल करणें कसें आवश्यक आहे हें त्यांनीं समर्पकपणानें सिद्ध केलें आहे.

---

## नवीन निघालेल्या नोटा : शंकासमाधान

"नवीन निघालेली एक रुपयाची नोट ही गव्हर्मेंट ऑफ इंडियानें काढलेली आहे. रिझर्व्ह बँकेनें काढलेली नाहीं. संदरहु बँकेच्या स्थापनेच्या वेळीं नोटा काढण्याचा अधिकार तिला मिळालेला आहे, असें प्रसिद्ध झालें होतें, तो तिचा हक्क कमी न करतां गव्हर्मेंटनें ही नोट काढणें पूर्णपणें कायदेशीर आहे किंवा नाहीं," अशी आमच्या एका वाचक-मित्रानें शंका प्रदर्शित केली आहे.

ह्यासंबंधांत सरकारनें २४ जुलै रोजीं एक व्यापक ऑर्डिनन्स काढलेला आहे, त्यांत असें म्हटलें आहे कीं, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टांत कांहींहि तरतूद केलेली असली तरी ह्या ऑर्डिनन्सनें, सरकारास एक रुपयाच्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया नोटा काढण्यास परवानगी देण्यांत येत आहे. ह्या नोटा १९०६ च्या इंडियन कॉयनेज ॲक्टाप्रमाणें पाडण्यांत येणाऱ्या रुपयासमान समजावयाच्या आहेत. "रुपयाचें नाणें" ह्यांतच त्यांचा समावेश व्हावयाचा असून रिझर्व्ह बँकेच्या व्यवहारांत त्या नोटा म्हणून समजल्या जात नाहींत. ऑर्डिनन्सच्या अन्वयें हिंदुस्थान सरकारनें प्रचलित केलेल्या नोटा ह्या रिझर्व्ह बँकेच्या कायद्याप्रमाणें चलनी नोटा न समजतां त्या रुपये म्हणून मानल्या जात आहेत. सारांश, नवीन प्रचलित केलेल्या नोटा ह्या नोटा नाहींत; त्यास कागदी रुपये म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. ह्या नोटांस रिझर्व्ह बँक ॲक्ट लागू नाहीं. सरकारनें नवीन नोटा न काढतां रुपयेच काढलेले आहेत, असें समजावयाचें आहे. बँकेस रुपये पुरविण्याचें काम गव्हर्नर जनरल इन कौन्सिलचें आहे. रिझर्व्ह बँकेच्या मागणीस अनुसरून तिला रुपये देण्यास गव्हर्नर जनरल इन कौन्सिल बांधलेला आहे. हे रुपये कमी पडले, म्हणून नवीन नोटा बँकेस देऊन त्या रुपयाच्या नाण्यांसमान समजण्यास ऑर्डिनन्सनें परवानगी दिली आहे. रिझर्व्ह बँक ॲक्टाच्या २२ व्या कलमानें तिला नोटा काढण्याचा एकमेवाद्वितीय अधिकार दिला असून, गव्हर्नर जनरल इन कौन्सिलचा त्याबाबत अधिकार त्या कलमानें काढून घेतलेला आहे. तथापि, गव्हर्नर जनरलला ऑर्डिनन्स काढण्याचा सर्वव्यापी अधिकार आहेच.

"सदरहु नोट बदलून तिच्या ऐवजीं चांदीचा रुपया देण्याचें वचन—सरकारी ट्रेझरीमधून—ह्या नोटेवर नाहीं. Promise to pay on demand हे शब्द रिझर्व्ह बँकेच्या नोटांवर व त्याच्या आधीच्या गव्हर्मेंट नोटांवर असतात. आतां ही कागदाची नोट म्हणजेच रुपया समजावयाचा आहे आणि म्हणून ह्या नोटेच्या बदला धातूचा रुपया देण्यास सरकार आपणांस बांधून घेत नाहीं असा समज होण्याचा संभव आहे". अशीहि शंका आमच्या वाचक-मित्रानें व्यक्त केली आहे. नवीन नोट म्हणजे कागदाचा रुपयाच असल्याकारणानें त्याच्या बदला रुपया देण्याचा प्रश्नच उरत नाहीं, अशी वस्तुस्थिति आहे. ज्याप्रमाणें केवढीहि मोठी रकम धातूच्या रुपयांत दिली असतां घेणारास ती स्वीकारावी लागते, तद्वतच नवीन नोटा स्वीकारल्या पाहिजेत, असें ऑर्डिनन्समध्यें स्पष्टपणें म्हटलें आहे. नोटीच्या बदली धातूचा रुपया देण्याचें बंधन सरकारावर नाहीं. रुपयांची बचत व्हावी आणि ते कमी पडूं नयेत ह्यासाठी त्यांचा साठा वाढविण्याचे उद्देशानेंच कागदी रुपये काढण्यांत आले आहेत. रुपये साठवून ठेवण्यांत आल्यामुळें त्यांचा तुटवडा पडेल, तो ह्या नवीन नोटांनीं भरून यावा, असा उद्देश आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, नवीन नोटा ह्या रुपयांचे जागीं आहेत; त्या कागदी आहेत म्हणून त्यांस नोटा म्हणावयाचें, इतकेंच.

पब्लिक अकौंट्स कमिटीची सभा ता. २१ रोजीं सिमला येथें भरली होती, त्यावेळीं रुपयाच्या नवीन नोटांसंबंधीं खालील खुलासा करण्यांत आला. "ह्या नोटांवर रुपये देण्याचें वचन नाहीं, तें असणें आवश्यक आहे, अशी तक्रार ऐकूं येते, ती निराधार आहे. रुपयाच्या नाण्यांचे साठ्यावरील पडणारा ताण कमी करण्याचे उद्देशानेंच नवीन नोटा प्रसृत केलेल्या आहेत. ह्या नोटांचे बदली रुपये देण्याचें बंधन नाहीं; मात्र त्यापेक्षां लहान नाणीं देण्याची जबाबदारी स्वीकारलेली आहे." ह्या खुलाशावरून वरील विवेचनाचें स्पष्टीकरण होईल.

■ मधुर संगीत ■ भारदस्त संवाद
■ रम्य वनश्री ■ मोहक नृत्य
यांचा मधुर मिलाफ !
लपंडाव
नवयुगचें प्रभावी समाजचित्र—
विनायक — मीनाक्षी
यांच्या लेखकर प्रणयाची बहार लुटा—
मिनर्व्हा—पुणें.
२रा आठवडा
शिवाय
मुंबई, कोल्हापूर, नाशिक, अहमदाबाद येथें सुरू आहे.

## स्फुट विचार

### मि. चर्चिल ह्यांचें नमुनेदार भाषण

मुख्य प्रधान ह्या नात्यानें ग्रेटब्रिटनच्या राज्यकारभाराचीं सूत्रें मि. चर्चिल ह्यांनीं स्वतःच्या हातीं घेतल्यापासून युद्धाचे बाबतींतल्या ब्रिटिश धोरणास नवीन व इष्ट असें वळण लागलें आहे. करारीपणा, निश्चयीपणा, धडाडी व स्पष्टवक्तेपणा हे त्यांचे गुण ठळकपणानें ब्रिटिश युद्धधोरणांत प्रतीत झाले आहेत. सध्याच्या आणीबाणीच्या प्रसंगीं हिटलरशाहीस तोंड देण्यास इंग्लंडला मि. चर्चिल सारखा पुढारी लाभला हें त्या राष्ट्राचें सुदैव होय. त्यांनीं कॉमन्स सभेंत युद्धपरिस्थितीचें सिंहावलोकन आपल्या भाषणांत केलें, त्याची वहावा सर्वत्र झाली आहे, ती वर निर्दिष्ट केलेल्या गुणांमुळेंच होय. गेलें महायुद्ध आणि चालू युद्ध ह्यांचेमध्यें डावपेंच, शस्त्रास्त्रें इत्यादींचे बाबतींत केवढा मोठा भेद आहे, हें त्यांनीं कॉमन्स सभेंतील आपल्या ताज्या भाषणांत विशद करून सांगितलें. सध्या चालू असलेल्या लढायांमध्यें आघाडीवरील शिपाईच गुंतलेले असतात, असें नसून सबंद राष्ट्रास त्यांत पडावें लागत आहे. इंग्लंडचें युद्धसामुग्रीचें उत्पादन झपाट्यानें वाढत असून तें जर्मनीच्या शस्त्रास्त्रांच्या पुरवठ्याच्या बरोबरीस येत आहे. ह्या महिन्यांत इंग्लंडवर स्वारी करून तें पादाक्रांत करण्याची हिटलरनें दिलेली धमकी निष्फळ ठरली आहे. तथापि, तो निकराचा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर करील, त्यास तोंड देण्याची आणि त्याकरितां पडेल तो स्वार्थत्याग करण्याची तयारी ब्रिटिश जनतेनें ठेवली पाहिजे अशी सूचना मि. चर्चिल ह्यांनीं स्पष्टपणानें दिली आहे. प्रस्तुत युद्ध आणखी दोन वर्षें चालवण्याची आणि शेवटीं हिटलरशाहीचा पूर्ण नाश करण्याची धमक इंग्लंड व त्या राष्ट्राचे साथीदार ह्यांचेमध्यें असल्याचें त्यांनीं ठासून सांगितलें. अमेरिकेचें सहकार्य इंग्लंडला वाढत्या प्रमाणांत मिळत आहे ही उत्तेजनदायक घटना आहे, ह्यांत शंका नाहीं. ब्रिटिश व्यापाराची नाकेबंदी करण्याची जर्मनीची धमकी व्यर्थ आहे. तसेंच, युरोपांतील राष्ट्रांत लोकांची उपासमार होत आहे, त्याची जबाबदारी सर्वस्वी जर्मनीचे शिरावर आहे हें मि. चर्चिल ह्यांनीं असंदिग्धपणानें स्पष्ट केलें. एकंदरीनें त्यांच्या भाषणाचा परिणाम सर्वत्र अनुकूल झालेला आहे आणि निश्चय व सावधगिरी ह्यांचें मिश्रण असलेलें वातावरण त्याचे योगानें निर्माण झालें आहे.

### मुदतीच्या हुंड्या व प्रॉमिसरी नोटा ह्यांवरील स्टँपड्यूटी

मुंबईच्या सुपरिंटेंडंट ऑफ स्टँप्स ह्या अधिकाऱ्यांनीं लोकांच्या माहितीसाठी एक खुलासा केला आहे त्याचेकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. मुदती हुंड्यांचेवर स्टँपड्यूटी कमी केली असल्याविषयीं हिंदुस्थान सरकारनें गेल्या जानेवारी महिन्यांत जाहीर केलें होतें तो बदल प्रॉमिसरी नोटांवरील स्टँपांच्या दरास लागू नाहीं ही गोष्ट त्यांनीं स्पष्ट केली आहे. एक वर्षाच्या आंतील मुदतीची हुंडी किंवा बिल ऑफ एक्सचेंज ह्यांवरील स्टँपड्यूटी दर हजार रुपयांस किंवा हजार रुपयांच्या भागास दोन आणे केलेली आहे. अशा प्रकारच्या हुंड्यांस उत्तेजन मिळून बँकिंगच्या व्यवहारांची प्रगति व्हावी ह्या हेतूनें सरकारनें लोकांच्या सूचनेस अनुसरून ही सवलत दिलेली आहे, हें वाचकांस स्मरत असेल. हिंदी स्टँपाच्या कायद्यांत मुदती हुंड्या व प्रॉमिसरी नोटा ह्यांचेविषयीं भिन्नभिन्न तरतूद केलेली असून हे रोखे एकच स्वरूपाचे नाहींत ही गोष्ट स्पष्ट केली आहे. दोन्ही रोखे मुदतबंदी असले आणि विशिष्ट रकमेवरील त्यांचे संबंधांतली स्टँपड्यूटी एकच दराची असली तरी मुदतीचे हुंड्यांवरील ड्यूटी कमी झाली कीं प्रॉमिसरी नोटांवरील ड्यूटीहि कमी झाली असें कोणी समजतां कामा नये. ह्या नोटांवरची ड्यूटी कमी-ज्यास्त करावयाची तर त्या बाबतींत स्वतंत्र रीतीनें व्यवस्था व्हावी लागेल. प्रॉमिसरी नोटेवर योग्य, कायदेशीर स्टँप लावलेला नसेल तर स्टँपॲक्टाच्या ३२ व्या किंवा ४२ व्या कलमाखाली सर्टिफिकेट देऊन तो दोष दूर करण्याचा अधिकार कलेक्टरास नाहीं. त्याचप्रमाणें, पुरी ड्यूटी किंवा दंड भरला जाऊन प्रॉमिसरी नोट पुराव्यांत कोर्टीमध्यें दाखल होऊं शकत नाहीं. ह्या गोष्टीकडेहि सुपरिंटेंडेंट ऑफ स्टँप्स ह्यांनीं लक्ष वेधलें आहे. हा खुलासा लोकांनीं ध्यानांत बाळगून आपले व्यवहार करणें इष्ट आहे.

### पिकांच्या उत्पादनाचें नियंत्रण

हिंदुस्थानांतील कच्च्या मालास युरोपांतील शत्रु-राष्ट्रांच्या व इतर पेठा युद्धपरिस्थितीमुळें बंद झाल्याकारणानें, पुऱ्या मागणीच्या अभावीं त्यांची किंमत कमी होणें आणि त्या मानानें हिंदी शेतकऱ्यांची प्राप्ति घटणें अपरिहार्य आहे. सुमारें ३० कोटि रुपये किंमतीच्या हिंदी मालाचें परराष्ट्रीय गिऱ्हाईक ह्या रीतीनें तुटलें आहे आणि त्याच्या जागीं दुसरें गिऱ्हाईक शोधणें आवश्यक आहे. इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतील बाजारपेठांनीं अधिक हिंदी मालाचा उठाव करावा म्हणून खटपट चालली आहे. हिंदुस्थानांतून ह्या बाबतींत प्रयत्न करण्यासाठीं दोन अधिकारी गेले आहेत, त्यांस किती यश येतें हें पहावयाचें आहे. कांहीं झालें तरी तीस कोटि रुपयांच्या मालाचा उठाव ह्या मार्गांनीं होणें कठीण आहे. मागणीच्या अभावीं पिकांचा उत्पादन खर्च निघण्याइतक्याहि किंमती शेतकऱ्यांस मिळणार नसतील तर त्यांचें क्षेत्र मर्यादित करणें हा उपाय शिल्लक रहातो. पण कोणतीं पिकें कमी करावीं आणि कोणत्या प्रमाणांत त्यांस मर्यादा घालावी हें ठरवणें अवघड आहे. हिंदुस्थान सरकारनें ह्या प्रश्नाचा विचार चालवला आहे आणि कपास, कॉफी व गळिताचीं धान्यें ह्यांचे संबंधांत नियंत्रण करावें लागेल असें दिसतें. तथापि, मर्यादित केलेल्या पिकांच्या जागीं दुसरीं पिकें सुचवणें अगत्याचें आहे; नाहीं तर जमिनी मोकळ्या पडून शेतकरीवर्गाची कुचंबणा झाल्यावांचून रहाणार नाहीं. प्रांतिक सरकारांच्या कक्षेंत येणारा हा शेतीविषयक प्रश्न असल्यानें त्यांच्या व व्यापारी मंडळांच्या संमतीनेंच तो सोडवावा लागेल. कित्येक पिकांचें क्षेत्र अनेक प्रांतांमध्यें वाटलें गेलें असल्यानें आणि परराष्ट्रीय व्यापार हा विषय मध्यवर्ती सरकाराचा असल्यानें ह्या सर्वांचा सहविचार होणें अगत्याचें आहे.

### पोर्ट ट्रस्टसची घटना बदला

हिंदुस्थानांतील बंदरांचा कारभार पहाण्यासाठीं कार्यकारी मंडळें सरकारनें नेमलीं आहेत, त्यांत हिंदी लोकांच्या मतास जसा हवा तसा मान मिळत नाहीं, अशी जुनी तक्रार आहे. बंदरांच्या व्यवस्थेशीं व्यापाऱ्यांचा मुख्यत्वें करून संबंध येतो आणि तींमध्यें हिंदी व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधींस योग्य स्थान मिळणें आवश्यक आहे, ह्याविषयीं वास्तविक मतभेद होऊं नये. पोर्ट ट्रस्टसच्या अधिकाराच्या जागांमध्यें हिंदी लोकांस संधि मिळत नाहीं आणि ह्या जागा तर जबाबदारीच्या व मोठ्या पगाराच्या असतात. सरकारी खातीं, सैन्य, रेलवेज इत्यादिमध्यें नोकरीचें हिंदीकरण व्हावें म्हणून ओरड चालली आहे,

तीच प्रकार पोर्ट ट्रस्ट्सचे संबंधांत आहे. हिंदी व्यापारी मंडळांच्या मध्यवर्ती संस्थेनें हिंदुस्थान सरकारच्या व्यापारी खात्यास लांबलचक पत्र लिहून त्यामध्यें असें म्हटलें आहे कीं, पोर्ट ट्रस्ट्सच्या कारभाराची घटना बदलण्याचा प्रश्न तात्काळ हातीं घेण्यांत यावा. हिंदी राज्यकारभारांत मोठमोठ्या जबाबदारीचीं कामें कार्यक्षम रीतीनें उरकण्याची लायकी हिंदी लोकांनीं सिद्ध केली आहे. पण पोर्ट ट्रस्ट्सच्या अध्यक्षाची जागा मंडित करण्याची जणूं काय त्यांचेमध्यें पात्रता नाहीं. हिंदी अध्यक्षाची पोर्टट्रस्ट्मध्यें नेमणूक केल्याचें केवळ अपवादात्मक असें एकच उदाहरण अलीकडे घडलें आहे. ह्या अपवादाचा निर्देश करून फेडरेशनच्या कार्यकारी मंडळानें असें म्हटलें आहे कीं, ह्या दर्जाच्या इतर कित्येक जागांवर हिंदी लोक नेमलेले नाहींत ह्या समर्थनांत कांहीं स्वारस्य नाहीं. पोर्टट्रस्ट्सच्या कारभारांत हिंदी व्यापाऱ्यांस योग्य प्रतिनिधित्व देण्यांत येत नाहीं ही गोष्ट नाकबूल करतां येण्यासारखी नाहीं. तेव्हां, ह्या प्रश्नाचा निकाल पुढें ढकलण्यांत येऊं नये आणि पोर्टट्रस्ट्सची घटना बदलून तीमध्यें हिंदी व्यापाऱ्यांस त्यांचें योग्य स्थान सरकारनें द्यावें अशी मागणी फेडरेशननें केली आहे.

### हिंदी लष्करी खर्च

सध्या हिंदुस्थानाचा मोठ्या प्रमाणावर लष्करी खर्च चालू आहे, त्याचा कांहीं अंश ब्रिटिश सरकार उचलील अशी अपेक्षा कांहीं ठिकाणीं व्यक्त केली जात आहे. हिंदी लष्करी खर्चापैकी कांहीं खर्च आजच ब्रिटिश सरकार करीत आहे व ह्या योजनेंत बदल होण्याचा संभव नाहीं असें समजतें. सध्याच्या व्यवस्थेनुसार, चॅटफील्ड कमिटीनें ठरविल्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारनें शांततेच्या काळीं येणारा मामुली लष्करी खर्च करावयाचा आहे. बाजारभाव वाढले, तर त्याचा बोजा हिंदुस्थानानेंच उचलावयाचा आहे. अशा रीतीनें, ३६ कोटि, ७७ लक्ष रुपये खर्चाची व्यवस्था आहे. हिंदुस्थानाबाहेर—उदाहरणार्थ मलाया व मध्य आशिया इकडे—गेलेल्या कांहीं फौजांच्या खर्चाची जबाबदारी हिंदुस्थानावरच आहे; ह्या फौजा नड पडल्यास हिंदुस्थानाचे मदतीस येतील, असें त्याचें समर्थन आहे. त्याचप्रमाणें, हिंदुस्थानानें आपल्या स्वतःच्या बचावासाठी कांहीं लष्करी खर्च केला, तर तो हिंदुस्थानानेंच द्यावयाचा आहे. हिंदी फौजा हिंदुस्थानाबाहेर ब्रिटिश सरकारच्या नडीप्रमाणें नेण्यांत आल्या तर त्यांचा खर्च ग्रेटब्रिटननें सोसावयाचा आहे. ह्या फौजांचे बदली दुसऱ्या पलटणी न्याव्या लागल्या तर त्या तयार करण्यास लागणारा खर्चहि हिंदुस्थानावर पडावयाचा नाहीं. हिंदी लष्कराच्या आधुनीकरणासाठी ब्रिटिश सरकारनें चालू युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी ३४½ कोटि रुपयांची देणगी हिंदुस्थान सरकारास दिली व ११½ कोटि रुपये पांच वर्षांच्या मुदतीनें बिनव्याजी कर्जाऊ दिले. युद्धास प्रारंभ झाल्यावर, मूळ योजनेप्रमाणें व किंमतीप्रमाणें युद्ध साहित्य पुरविण्यांत ग्रेटब्रिटनला अडचण वाटूं लागली, हें स्वाभाविक आहे. तथापि, ह्याबाबत शक्य तेवढ्या कसोशीनें प्रयत्न चालू आहेत, असें समजतें.

### पुरुषार्थ

"पुरुषार्थ" ह्या मासिकास ऑगस्ट, १९४० मध्यें १७ वें वर्ष सुरू झालें. ह्या मासिकानें आपलें संस्कृतिसंवर्धनाचें उच्च ध्येय कायम ठेवून त्याच्या अनुरोधानें कार्य अविरत चालवलें आहे. अनेक अधिकारी लेखकांचें त्यास उत्कृष्ट सहकार्य लाभलें आहे. अशा प्रकारच्या ध्येयात्मक मासिकास लोकप्रियता मिळवून देण्याचें काम अवघड असतें, परंतु पुरुषार्थाच्या संपादकांनीं त्यांत अभिनंदनीय यश मिळविलें आहे. हें मासिक नियमितपणें प्रसिद्ध होतें व त्यानें जबाबदार महाराष्ट्रीय समाजांत मानाचें स्थान प्राप्त करून घेतलें आहे.

## दोन मृत्यू

### सर ऑलिव्हर लॉज

सुप्रसिद्ध ब्रिटिश शास्त्रज्ञ, सर ऑलिव्हर लॉज, हे गेल्या आठवड्यांत निवर्तले, त्यावेळीं त्यांचें वय ८९ वर्षांचें होतें. विजेच्या संबंधांत त्यांनीं महत्त्वाचे शोध लावले आहेत. आवाज व इलेक्ट्रो-मॅग्नेटिक लहरी ह्या विषयींच्या त्यांच्या संशोधनामुळें बिनतारी संदेश पाठविणें शक्य झालें. परलोकविद्येकडे त्यांनीं आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धांत विशेष लक्ष पुरविलें. त्यांनीं अनेक ग्रन्थ लिहिले आहेत. सर ऑलिव्हर लॉज ह्यांची उंची ६ फूट, ३ इंच होती व त्यांचें वजन २१० पौंड होतें.

### लिऑं ट्रॉट्स्की

रशियन क्रांतिकारक, लिऑं ट्रॉट्स्की, ह्यांचेवर खुनी हल्ला करण्यांत आला, त्याचें पर्यवसान त्यांच्या निधनांत ता. २१ ऑगस्ट रोजीं झालें. ट्रॉट्स्की हा लेलिनचा उजवा हात होता, व त्याच्या सहायानेंच लेलिननें आपल्या पक्षास बलवान केलें. गेल्या महायुद्धाचे सुरवातीस त्यास एकसारखें देशांतर करावें लागलें; अखेर १९१७ मध्यें तो रशियास परतला. जर्मनी व रशिया ह्यांचेमधील युद्ध समाप्त करणाऱ्या तहावर त्याचीच सही आहे. त्यानें रशियाच्या उद्धारासाठी सर्वांगीण संघटना घडवून आणण्याचा प्रयत्न केला. पुढें स्टॅलिन व ट्रॉट्स्की ह्यांत वैषम्य व स्पर्धा ह्यांचा उद्भव झाला. समाजसत्तावाद रशियापुरता मर्यादित ठेवावा असें लेनिनचें म्हणणें होतें, तर त्यास जागतिक स्वरूप द्यावें असा ट्रॉट्स्कीचा आग्रह होता. १९२७ सालीं ट्रॉट्स्कीस रशियांतून हद्दपार करण्यांत आलें. १९३६ मध्यें त्यास मेक्सिकोंत आसरा मिळाला, तोंपर्यंत त्यास शांती नव्हती.

### व्यापार–उदिमाचें व्यावहारिक शिक्षण

मराठा चेंबरच्या नुकत्याच झालेल्या सहाव्या वार्षिक सभेच्या वेळीं होतकरू तरुणांस उमेदवारी पद्धतीनें व्यापार–उदिमाचें व्यावहारिक शिक्षण देण्याबाबतची योजना चेंबरनें करावी, अशी सूचना श्री. पां. के. शिराळकर व श्री. ग. स. मराठे यांनीं मांडली होती. तिचा उहापोह होऊन अशी सूचना चेम्बरनें प्रयोगादाखल हातीं घेऊन तिची अम्मलबजावणी करावी असें ठरलें आहे. चेंबरचे सभासद आपल्या कारखान्यांत, उद्योगधंद्यांत, दुकानीं, अगर पेढीवर होतकरू तरुणांस उमेदवार म्हणून आपल्या व्यवसायाचें व्यावहारिक शिक्षण देण्यास तयार आहेत काय व असल्यास त्यासंबंधीच्या त्यांच्या अटी काय आहेत याचा खुलासा चेंबरनें सभासदांकडून मागविला आहे.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

या बँकेची २३ वी वार्षिक साधारण सभा रविवार ता. २२ सप्टेंबर १९४० रोजीं दुपारीं १२–३० वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे दिवाणखान्यांत भरून अहवाल, ताळेबंद व नफ्याची वाटणी मंजूर करणें, हिशेबतपासनीस नेमणें, डायरेक्टर्स, चेअरमन व व्हाईस चेअरमन यांची निवडणूक करणें, पोटनियम दुरुस्ती वगैरे कामें करण्यांत येतील. तरी सर्व सभासदांनीं सभेस अगत्य यावें अशी विनंति आहे. निवडणुकीची वेळ सदर दिवशीं सकाळीं ८ ते १० व दुपारीं २ ते ४ आहे.

ता. २१ ऑगस्ट, १९४०. — द. वि. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

# हिंदी चलनाचा पाया मजबूत आहे

( मुंबई येथील रेडिओ स्टेशनमधून प्रो. वा. गो. काळे ह्यांनीं ता. २१–८–४० रोजीं केलेलें भाषण. )

## चलनाच्या तरतुदीची सरकारची जबाबदारी

युद्धाच्या काळांत राष्ट्रीय सरकारास आपल्या लोकांचें जीवित व मालमत्ता ह्यांचें संरक्षण करणें, शत्रूकडून होणाऱ्या हल्ल्यांचा प्रतिकार करण्याची तयारी ठेवणें, देशांतील व्यापार व उद्योगधंदे यांचे व्यवहार सुरळीत चालतील अशी व्यवस्था करणें इत्यादि गोष्टींचे बाबत विशेष खबरदारी घ्यावीं लागते. त्या व्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग म्हणून लोकांच्या रोजच्या व्यवहारास लागणारें चलन पुरविलें जाईल अशी तरतूद करण्याचें कामहि सरकारास करावें लागतें. व्यापार, उद्योगधंदे व जनतेचे पोटापाण्याचे व्यवहार ह्यांचेमधील देवघेवी चलनाच्या सहायावांचून होत नाहींत. म्हणून शांततेच्या काळांतहि सरकारास त्यांविषयींची तजवीज स्वतः किंवा मध्यवर्ती बँकेच्या मार्फत करावी लागते. युद्धाच्या परिस्थितींत राष्ट्रीय आर्थिक जीवनाची व्यवस्था बिघडते आणि व्यापार, उद्योगधंदे, बाजारभाव यांची घडी विस्कटते. अशा प्रसंगीं व्यवहारांत खेळणारें चलन जरूरीच्या मानानें कमीजास्त होऊन त्या चलबिचलींचे प्रतिकूल परिणाम राष्ट्राच्या सबंद जीवनावर अनिष्ट रीतीनें होण्याची व देशांत गोंधळ माजण्याची भीति असते. देवघेवीस लागणारें चलन देशांत खेळत राहील आणि तें फाजील होणार नाहीं किंवा त्याची वाण भासणार नाहीं ह्याविषयींची खबरदारी सरकारास घ्यावीं लागते.

## चलनाचे तीन भाग

सुदैवानें हिंदुस्थानांतील चलनपद्धतीचा पाया मूलतःच भरभक्कम असल्यानें युद्धपरिस्थितीमुळें तिच्या संबंधानें येथील सरकारास विशेष अडचणी भासल्या नाहींत आणि ह्यापुढें त्या भासण्याचा संभव नाहीं. बदलणाऱ्या परिस्थितींत चलनाच्या व्यवस्थेंत किरकोळ फेरबदल करावे लागले तरी त्यांचे योगानें जनतेच्या व्यवहारांत कोणतीच अडचण भासण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानांतील सध्याची चलनविषयक परिस्थिति कशी समाधानकारक आहे, तें पहा. कोणत्याहि देशाच्या चलनांत दोन मुख्य व एक दुय्यम असे तीन भाग असतात. मुख्य भाग ( १ ) सोन्या-चांदीचीं नाणीं व ( २ ) चलनी नोटा ह्यांचा असतो आणि ( ३ ) तिसऱ्या भागामध्यें हलक्या धातूंचीं किरकोळ प्रतीचीं नाणीं येतात. आज जगांतील कोणत्याहि देशांत सोन्याचें नाणें व्यवहारांत चालू नाहीं. चांदीचीं व हलक्या धातूंचीं किरकोळ नाणीं मात्र प्रचलित आहेत. जगाच्या प्रमुख व पुढारलेल्या सर्व देशांत बहुतेक व्यवहार कागदाच्या चलनी नोटांच्या सहायानें चालतात. चलनी नोटा वापरण्यास सोयीच्या असल्यानें त्यांचा प्रसार सर्व देशांत मोठ्या प्रमाणावर झाला आहे. चलनाचा उपयोग—तें चलन चांदीचें असो कीं कागदाचें असो—वास्तविक रीतीनें देवघेवींचे व्यवहार सुकर व्हावे म्हणून करावयाचा असतो. चलनाचा अर्थ व उद्देश असा आहे कीं, तें व्यवहारांत खेळत रहावें आणि त्याची देवघेवीस मदत व्हावी. सामान्यतः किरकोळ देण्या-घेण्यासाठीच रुपयासारख्या नाण्यांची आवश्यकता असते. लहान-मोठ्या किंमतीच्या नोटा काढण्यांत येतात त्याचा हेतु त्या लोकांनीं सर्व प्रकारचीं आपलीं देणीघेणीं भागवण्यासाठी वापराव्या असा असतो.

## रुपयांचा भरपूर संचय

किरकोळ देण्यांसाठी चलनी नोटांच्या मोबदल्यांत रुपायासारखीं नाणीं मिळणें जरूर असल्यानें ह्या मोबदल्याची तरतूद कायद्यानें केलेली असते. नोट घेऊन येणारांस ती मोडून तिचे रुपये देण्याची व्यवस्था हिंदुस्थानांतील चलनपद्धतिमध्यें आहे, ती ह्यासाठीच होय. वास्तविक पहातां व्यवहारांतील देवघेवीचें कार्य चलनी नोटांनीं उत्कृष्टपणानें भागत असतां किरकोळीशिवाय इतर व्यवहारांत रुपयासारख्या नाण्यांचें प्रयोजन असूं नये आणि असलीं नाणीं मोठ्या प्रमाणांत पाडण्याची किंवा प्रचलित करण्याची जरूर भासूं नये. अशीच परिस्थिति पुढारलेल्या देशांत असते. तथापि, हिंदुस्थानांतील बहुसंख्य जनता निरक्षर, अडाणी व मागसलेली असल्यानें लहान शहरांतून व खेडेगावांतून नोटा वापरणें गैरसोयीचें होतें आणि त्यांस रुपयांची आवश्यकता भासते. ही गोष्ट लक्षांत घेऊन हिंदुस्थान सरकार आणि रिझर्व्ह बँक यांनीं अनेक वर्षांच्या अनुभवाच्या दृष्टीनें रुपयांचा भरपूर संचय आपले जवळ ठेवला आहे आणि हीं नाणीं पाडण्याची उत्कृष्ट व्यवस्था सरकारनें केलेली आहे. ज्या धातूचे रुपये पाडावयाचे, त्या चांदीची हिंदुस्थानांत वाण नाहीं, हिंदी टांकसाळी कार्यक्षम आहेत आणि सरकारजवळ रुपयांचा साठा भरपूर आहे. तेव्हां रुपयांचे विषयींच्या गरजा भागवण्याचें सामर्थ्य ह्या देशांत आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. मध्यंतरीं रुपयांच्या नाण्यांची चणचण भासल्यासारखी दिसत होती तिच्या मुळाशीं लोकांचें अज्ञान, गैरसमज व कांहीं मतलबी लोकांची कारवाई हींच होतीं हें आतां स्पष्ट झालें आहे. खरी वस्तुस्थिति जनतेच्या निदर्शनास आणली गेल्यानें तेव्हां तात्पुरती झालेली रुपयांची कृत्रिम चणचण दूर झाली आहे हें समाधानकारक आहे.

## नोटांचा उपयोग मौल्यवान धातूंची बचत

चलनी नोटांचें स्वरूप आणि हेतु यांचें स्पष्टीकरण येथें केलें आहे, त्यासंबंधांत हें सांगणें आवश्यक आहे कीं, सर्व राष्ट्रांच्या चलनव्यवस्थेंत नोटांच्या मोबदला सोनें किंवा चांदी ह्यांचीं नाणीं किंवा ऐनजिनसी धातूंचे पाटले देतां येण्याची तरतूद केलेली असते. सोन्या–चांदीच्या नाण्यांच्या ऐवजी नोटा ज्या प्रमाणांत वापरल्या जातात, त्या प्रमाणांत ह्या मौल्यवान धातूंची बचत होत असते, हा नोटांपासून राष्ट्रास होणारा फायदा आहे. तथापि, नोटांच्या मोबदल्यांत धातूंचीं नाणीं लोकांस हवीं असल्यास तीं त्यांस देतां यावीं म्हणून एकूण नोटांच्या किंमतीच्या विशिष्ट प्रमाणांत सोन्या–चांदीचा संचय मध्यवर्ती बँका आपणांजवळ बाळगतात. बँकांच्या सामान्य व्यवहाराचा दाखला दिला असतां ह्या व्यवस्थेचें स्वरूप स्पष्ट होईल. एका बँकेपाशीं दहा लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत असें समजूं. सर्वच ठेवीदार आपल्या ठेवी परत मागण्यासाठी बँकेकडे एकावेळीं येत नाहींत असा नेहमीचा अनुभव आहे. त्यास अनुसरून बँक ठेवींच्या एकूण रकमेपैकी निम्म्यावर रकम कर्जाऊ देते आणि कांहीं रोकड व रोखे जवळ बाळगते. ठेवींचा सर्व पैसा बँकेनें जवळ ठेवला तर तिला कर्जें देऊन नफा मिळवण्याची व ठेवीदारांस त्यांच्या रकमांवर व्याज देण्याची सवड होणार नाहीं आणि आपले व्यवहार बंद करावे लागतील. त्याचप्रमाणें, मध्यवर्ती बँकेनें

आपण प्रचलित केलेल्या नोटांच्या पूर्ण किंमतीचें सोनें व चांदी संग्रहीं ठेवली तर ह्या व्यवस्थेंत बचत कांहींच होत नाहीं आणि नोटा काढण्यापासून कांहींच फायदा नाहीं. म्हणून एक लक्ष रुपये किंमतीच्या नोटा मध्यवर्ती बँकेनें प्रचलित केल्या असतां त्याच्या चाळीस टक्क्यांइतकें सोनें किंवा चांदी तिनें जवळ संग्रहांत ठेवली असतां कार्यभाग होतो. अशा तऱ्हेची व्यवस्था बहुतेक सर्व देशांत कायद्यानें केलेली असते व ह्या योगानें कागदी चलनावर सामान्य जनतेचा विश्वास बसण्यास सहाय होतें.

### हिंदी नोटांस पुरेसें तारण

हिंदुस्थानची चलन व्यवस्था नोटांच्या धातुमय तारणाच्या दृष्टीनें भरभक्कम पायावर उभारलेली आहे हें त्या संबंधांतले अगदी ताजे आकडे सांगितले असतां स्पष्ट होईल. रिझर्व्ह बँकेनें अलीकडे चलनविषयक माहिती प्रसिद्ध केली आहे. तीवरून असें दिसतें, कीं हिंदुस्थानांत सुमारें २५० कोटि रुपये किंमतीच्या नोटा काढलेल्या आहेत. त्यांस आधार व तारण म्हणून बँकेच्या संग्रहांत सुमारें ४४३/४ कोटि रुपये किंमतीचें सोनें आहे. दर तोळ्यास २१ रुपये या दरानें हें सोनें रिझर्व्ह बँकेच्या हिशेबांत दाखल आहे. म्हणजे आज सुमारें ९० कोटि रुपये किंमतीच्या सोन्याचा निधि चलनी नोटांच्या तारणामध्यें आहे असें म्हटलें पाहिजे. सोन्यास जगामध्यें सर्वत्र सारखी मागणी असते, ह्या कारणानें ह्या सुवर्णनिधीचें विशेषच महत्त्व आहे. ह्याशिवाय चलनाच्या निधीमध्यें सुमारें १३२ कोटि रुपये किंमतीचे पौंड स्टर्लिंगमधले रोखे आहेत आणि त्यांतील हिंदुस्थान सरकारच्या रोख्यांची किंमत सुमारें ५० कोटि आहे. ह्या रोख्यांवर बँकेस व्याज मिळत असल्या कारणानें निधीचा हा भाग उत्पादक व फायदेशीर आहे. निधीचा शेवटचा भाग रुपयांचा त्यांतला संग्रह हा होय आणि त्यांची रक्कम ३६ कोटि रुपयांची आहे. एकूण नोटांच्या किंमतीशी सोनें व स्टर्लिंगमधले रोखे यांचें प्रमाण ६७ टक्के आहे. तें कायद्यानें किमान मर्यादा सुरक्षितपणाच्या दृष्टीनें घालून दिली आहे तिच्या मानानें किती तरी अधिक आहे. ९० कोटि रुपयांचें निधीमधलें सोनेंच नुसतें हिशेबांत घेतलें तरी त्याचें १/३ असें प्रमाण नोटांच्या एकूण किमतीशीं बसतें.

### रुपयांचा संचय करणें समाजघातक आहे


ह्या विवेचनावरून हिंदुस्थानांतील चलनी नोटांची व्यवस्था किती मजबूत पायावर उभी आहे ह्याविषयीं खात्री पटेल. नाण्यांचा उपयोग व्यवहारांत वापरण्यासाठी असून रुपये जमवून संग्रहीं ठेवण्याकरितां नाहींत हें ध्यानांत आलें म्हणजे जरूर नसलेलें नाणें मागणें हें किती समाजहानिकारक आहे हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. मला माझ्या कामासाठी नको असलेला रुपया मी मागितला किंवा जवळ ठेवला असतां मी त्या नाण्याचा दुरुपयोग करीत असून राष्ट्राचें नुकसान करीत आहें हें प्रत्येकास पटलें पाहिजे. नाण्यांत अडकून पडणाऱ्या सोन्या-चांदीची बचत करून त्यांच्याऐवजी शक्य तेथें नोटा वापरणें हें प्रत्येक हितचिंतकाचें कर्तव्य आहे. या दृष्टीनें पाहतां एक रुपयाच्या नोटा आतां प्रचलित झाल्या आहेत, त्या मागील महायुद्धांतील काळाप्रमाणें लोकप्रिय झालेल्या आहेत हें समाधानकारक असें प्रगतीचें लक्षण आहे. रुपयांचा संचय करूं पहाणें हें अडाणीपणाचें, संधिसाधूपणाचें आणि समाजघातकीपणाचें कृत्य आहे ह्याची जाणीव आतां सर्वत्र होत आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहे. असल्या हानिकारक कृत्यांपासून सर्वांनीं सावध रहावें, कारण त्यांत व्यक्तीचा अथवा समाजाचा फायदा नसून नुकसान आहे. सार्वजनिक हितानाहिताशीं व्यक्तीचें हितानहित गुंफटलेलें असतें हें तत्त्व इतर बाबतींप्रमाणें चलनासहि लागू आहे.

( रेडिओ अधिकाऱ्यांच्या परवानगीनें )


## फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर




लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखविल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा [illegible] आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ४५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. [illegible] किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

**फुकट** — प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट [illegible] दिली जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस [illegible] आणि टपाल हशील माफ.

पत्ताः—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. १७ ( A. P. ) अमृतसर (India.)

# सहकारी बँकांचे अहवाल

### मुंबई प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेचें भरणा झालेलें भांडवल ४,४६,१०० रुपये आहे. प्राथमिक जिल्हा लँड मॉर्गेज बँका प्रांतिक बँकेकडून जितकें कर्ज काढतात, त्याच्या ५% इतकी रकम त्यांस प्रांतिक बँकेच्या भागांत गुंतवावी लागते. ह्याप्रमाणें गेल्या वर्षी बँकेचे २५,३०० रुपयांचे नवीन भाग खपले. २० लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स सर्व खपल्यावर १० लाखांचीं आणखी डिबेंचर्स बँकेनें काढलीं, तीं आतां सर्व खपून गेलीं आहेत. ह्या डिबेंचरांचा व्याजाचा दर ३½% असून तीं ९८½% रुपयांस विकण्यांत आलीं. डिबेंचर्सच्या सिंकिंग फंडांत १,४७,५७० रुपये टाकून ते व त्यावरील व्याज सरकारी रोख्यांत गुंतविण्यांत आलें आहे. अहवालाचे वर्षी बँकेनें ४४३ अर्जदारांस मिळून ६,०७,४५० रुपये मंजूर केले. कर्ज देण्यास पुरेसे पैसे नसल्यामुळें ते देण्याचें काम चार महिने बंद पडलें होतें. त्यामुळें ह्या व्यवहारांत गेल्या वर्षाचे मानानें घट दिसत आहे. जिल्हा बँकांकडून येणें असलेल्या भांडवलापैकी ७७·५% आणि व्याजापैकी ९८·१% रकम वसूल झाली, ती सर्वसाधारणपणें समाधानकारक आहे, असा रिपोर्टांत शेरा आहे. मुंबई प्रांतांत एकूण १७ प्राथमिक लँड मॉर्गेज बँका असून त्यांपैकी १४ बँकांनीं प्रांतिक बँकेकडून कर्ज घेतलेलें आहे. बाकीच्या बँकांनीं आपला कर्जाचा व्यवहार अद्याप सुरू केलेला नाहीं. अहवालाचे वर्षी प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेस १७,०६८ रुपये नफा झाला, त्यांत मागील वर्षांतून ओढलेला नफा मिळविला, म्हणजे १८,००१ रुपये होतात, त्यांतून भागीदारांस ३½% डिव्हिडंड देण्याकडे १०,७८२ रुपयांचा विनियोग करण्यांत आला. दीर्घ मुदतीनें परत फेडावयाचें भांडवल अल्प व्याजानें मिळणें कठीण झाल्यामुळें नवीन सर्व कर्जांच्या परतफेडीची मुदत विसाचीं पंधरा वर्षे करण्यांत आलीं. व्याजाचा दरहि ½% नें वाढविण्यांत आला. ह्यामुळें नवीन कर्जांत भर पडण्याची गति मंद होईल, हें उघड आहे. बँकेची वार्षिक सभा ता. २५–८–४० रोजीं झाली.

### दि पूना मर्चंट्स को. बँक लि.

अहवालाचे वर्षअखेर बँकेचे पटावर ६७१ सभासद आहेत. बँकेचें भरणा झालेलें भांडवल ६९,२०० रुपये असून गंगाजळींत १७½ हजार रु., संशयित व बुडीत कर्जफंडांत ३½ हजार रु., रिबेट फंडांत ५½ हजार रु. व इतर फंडांत मिळून सुमारें ५ हजार रुपये आहेत. बँकेकडे एकूण सुमारें ३ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. बोर्डानें अहवालाचे सालीं रिकरिंग डिपॉझिटचें नवें ठेवीचें खातें सुरू केलें आहे. वरील खात्यावर ठेवीदारानें नियमितपणें कांहीं निश्चित ठरलेली रकम ठराविक महिने भरावयाची असून त्या मुदतीनंतर ती व्याजासह त्यास परत मिळावयाची, अशी व्यवस्था आहे. अहवालाचे वर्षी कर्जरकमा मंजूर करतांना त्या कांहीं प्रमाणांत कमी करण्याचें धोरण अवलंबिलें, त्यामुळें बँकेच्या एकूण खेळत्या भांडवलाचे मानानें कर्जांत गुंतविलेल्या रकमेचें प्रमाण ८२% वरून ६४% वर आलें. परंतु, कर्जाऊ दिलेली रकम २५–३० हजारांनीं कमी झाली व त्या प्रमाणांत थकलेली रकम वसूल होणें अशक्य असल्यामुळें थकबाकीचें प्रमाण २८% चे ३४% झालें. थकबाकीदारांस शक्य त्या सवलती देऊन पैसे वसूल करण्याचें धोरण बोर्डानें ठेवलें आहे. खेळत्या भांडवलाशीं खर्चाचें प्रमाण गुदस्तां २·१% होतें, तें अहवालाचे वर्षी १·८% पडलें. १९३९–४० अखेर बँकेस ६,२२२ रु. ९ आ. ८ पै नफा झाला, त्यांतून भागीदारांस ४% प्रमाणें डिव्हिडंड देण्याकडे २,७६० रुपयांचा विनियोग करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे. बँकेचें काम व्यवस्थित रीतीनें व काळजीकाळ्यानें चालू असल्याचें अहवालावरून दिसून येतें.

### नाशिक जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेचें वसूल भाग भांडवल २०,१९५ रुपये आहे. १९३९–४० मध्यें बँकेकडे १ लक्ष ५१½ हजार रुपयांच्या कर्ज-मागणीचे ११९ अर्ज आले. ६६ हजारांचे ५७ अर्ज नामंजूर झाले अगर काढून घेण्यांत आले. बँकेनें ७९ हजार रुपयांच्या कर्जाची शिफारस केली. प्रांतिक बँकेनें ७७,८०० रुपयांच्या कर्जाचे ७० अर्ज मंजूर केले. प्रत्यक्ष ६० अर्जदारांस ६५,९५० रुपये कर्ज देण्यांत आलें. ३४ हजारांच्या २८ अर्जांची चौकशी वर्षअखेर चालू होती. १९३५-४० ह्या मुदतींत बँकेकडे एकूण ९ लक्ष, २३½ हजार रुपयांच्या मागणीचे ६१४ अर्ज आले; प्रत्यक्ष २४८ अर्जदारांस २ लक्ष, ७८ हजार रुपये कर्ज दिलें गेलें. नाशिक, इगतपुरी, सिन्नर, निफाड, दिंडोरी, येवला, नांदगांव व मालेगांव ह्या तालुक्यांतच विशेषतः कर्ज वाटणी झाली; बागलाण, चांदवड, कळवण व पेठ ह्या चार तालुक्यांत मिळून फक्त १०½ हजार रुपयेच दिले गेले. कर्जदार सभासदांच्या २ लक्ष, ८३½ हजार रुपयांच्या कर्जांत ६६,३९३ रुपयांची सूट बँकेनें मिळवून दिलेली आहे. बँकेच्या वसुलीचें प्रमाण ८८% पडलें. बँकेनें प्रांतिक बँकेचें आपलें २१½ हजारांचें देणें ठरलेल्या तारखेस दिलें आहे. १९३९–४० सालअखेर बँकेस १,६८७ रुपये नफा झाला. "पुढील गरजेसाठीं अधिक कर्ज मिळणेबाबतची सोय मुंबई बँकेकडून लौकर न झाल्यानें आपले बँकेचे व्यवहारावर त्याचा बराच परिणाम झाला आहे" असा रिपोर्टांत शेरा आहे. बँकेचें काम व्यवस्थित रीतीनें चालू आहे.

### तालुका डेव्हलपमेंट ॲग्रिकल्चरल को. असोसिएशन, जळगांव

वरील असोसिएशन पूर्वीप्रमाणेंच 'अ' वर्गांत असून उपयुक्त काम करीत आहे. बी-बियाणें, खतें, कलमें व औतें ह्यांचा प्रसार असोसिएशननें चालू ठेवला आहे. शेतकरी लोकांना लोखंडी नांगरांची गोडी दिवसेंदिवस लागत आहे व असोसिएशनजवळील भाड्यानें देण्यासाठी ठेवलेले ५० नांगरहि अपुरे पडत आहेत. ज्या जातीला उभळ रोग लागत नाहीं व जी खानदेशच्या हवामानास योग्य आहे, अशा जरीला कापसाच्या जातीचा पेरा वाढविण्याचा असोसिएशन कसून प्रयत्न करीत आहे. दिल्ली येथील अखिल भारतीय पशु प्रदर्शनांत संस्थेनें चालविलेल्या पिंपळे येथील गिलिगन कॅटल फार्मांतील नेमाडी जातीचीं जनावरें पाठविलीं होतीं त्यांत त्यांनीं वरचीं बक्षिसें पटकावलीं. फार्ममधून दिलेले २९ वळू तालुक्यांतील १८ गांवीं प्रिमियम बुलपद्धतीनें ठेविले आहेत. असोसिएशननें व्हा. लेगहॉर्न ६० कोंबड्या व ऱ्होड आयलंड रेड १० कोंबड्या आणून २२–१०–३९ रोजीं मॉडेल पोल्ट्री फार्म सुरू केलें आहे. प्रात्यक्षिकें, गंधकाच्या उपयोगाबाबत प्रचार, शेतकी ज्ञानाचा प्रचार, बांधबंदिस्ती इत्यादि अनेक कार्यें असोसिएशननें उत्साहानें चालविलीं आहे. असोसिएशनचा वार्षिक रिपोर्ट माहितीपूर्ण असून त्यावरून तिच्या विविध कार्याचें स्वरूप चांगलें लक्षांत येतें.

## ठेव कीं कर्ज?

### प्रिव्ही-कौन्सिलचा निकाल

प्रतिवादीस सन १९२३ सालीं आपल्या मयत पित्याच्या मागीदाराकडून यावयाचे १ लक्ष २० हजार रुपये मिळाले. ही रकम त्यानें वादीच्या पित्याकडे नेऊन ती आपल्या पेढीवर ठेवण्यास त्यास सांगितलें. रकम मोठी असल्यानें ती पेढीच्या बँकेंतील खात्यांत ठेवण्याचें ठरून त्याप्रमाणें व्यवस्था झाली आणि प्रतिवादीनें दुसऱ्या रकमा पुढें दिल्या त्याहि अशाच रीतीनें ठेवण्यांत आल्या. येथें निश्चित करावयाचा प्रश्न ह्या रकमांच्या स्वरूपाविषयीं आणि त्यांस मुदतीच्या निर्बंधाचा कायदा लागू होतो कीं काय ह्या संबंधाचा होता. ह्या रकमा दिलेल्या कर्जाच्या स्वरूपाच्या असतील तर त्यांस कर्ज दिल्याच्या वेळेपासून तीन वर्षांच्या मुदतीच्या निर्बंधाचा नियम लागेल. परंतु त्या ठेव म्हणून समजण्यांत आल्या तर त्या मुदतीमध्यें येतील, कारण, ह्या मुदतीस प्रारंभ पैसे परत मागण्याच्या वेळेपासून होतो. मूळच्या कोर्टानें रकमा कर्ज समजून त्यांचे विषयींचा दावा मुदतीच्या बाहेर गेल्याचें ठरवलें. अपिलांत हा निकाल फिरवला गेला आणि रकमा ठेवीच्या स्वरूपाच्या असल्यानें दावा मुदतींत असल्याविषयीं अपीलकोर्टानें निकाल दिला.

कर्ज आणि ठेव ह्यांमधला भेद असा आहे कीं, मुदत निश्चित न करतां दिलेल्या पैशाचे बाबतींत ती घेणारावर ठेवीदाराच्या मागें लागून त्याची फेड करण्याची जबाबदारी पडत नाहीं. पैसा परत मागितला जाईपर्यंत तो ठेवून घ्यावयाचा एवढेंच त्याचें काम आहे. ठेवीदारानें आपला पैसा मागितला म्हणजे तो देण्याची जबाबदारी उत्पन्न होते. हें तत्त्व प्रस्तुत दाव्यास लावलें असतां पुराव्याकरून असें सिद्ध होतें कीं, वादीनें प्रतिवादीस आपला पैसा परत घेण्यास कधींच सांगितलें नाहीं. जेव्हां जेव्हां रकमा परत दिल्या गेल्या आहेत तेव्हां तेव्हां प्रतिवादीच्या मागणीवरूनच त्यांची परत फेड झालेली आहे. ह्या मुद्यावर न्यायमूर्तींनीं असा निकाल दिला कीं, दाव्यांतील रकमा ठेवी आहेत, कर्जाच्या स्वरूपाच्या नाहींत आणि म्हणून दावा मुदतींत आणण्यांत आला होता.

---


## गव्हर्नमेंट सर्व्हंट्स महाराष्ट्र को. बँक, लि. पुणें

सन १९४०–४१ सालचे कार्यवाह

सल्लागार मंडळ

१. रा. एच. आर. कुकनूर, २. एस. एस. दवळे, ३. डी. यू. मांढरे.

कार्यकारी मंडळ

१. रा. एम. एस. पंडीत, २. एस. जी. करमरकर, ३ सी. बी. लागवणकर, ४. डी. जे. कावळे, ५. एन. बी. भोगले, ६. वाय. डी. भोगले, ७. व्ही. एन. सुरुद, ८. के. एन. मुदलियार, ९. एस. व्ही. उपाध्ये.

हिशेबतपासनीस

१. रा. डी. एम. मोघे, २. व्ही. एस. गोरे.

ऑनररी सेक्रेटरी

१. रा. आर. डी. भणगे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| उभारलेलें भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१३,००,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र ऑफिस ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी (मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष). श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के., के. टी. ( रजेवर ); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, मि. आर. एल. केरार्ड.

### करंट डिपॉझिट अकाउंटस :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास व्यवस्था केली तरच मिळूं शकतें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. इतकी झाल्याशिवाय व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर मागवावेत.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टांचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकिंगचा सर्वसाधारण सर्व व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस

"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यात येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यात येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यात येतो.

सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारास टपाल हशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ता—लोकल कमर्शिअल कंपनी

पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर-Amritsar.

## मुंबईच्या बाजारांतील घडामोडी

### पैशाची विपुलता कायम

गेल्या आठवड्यांत मुंबईच्या बाजारांत त्या पूर्वीच्या आठवड्यांप्रमाणेंच कर्जाऊ देण्याघेण्याच्या पैशाची विपुलता होती. कॉल मनीचा दर ½% होता. पैशाची विपुलता होती, परंतु अल्पमुदतीच्या ठेवी ठेवण्याची प्रवृत्ति आढळली नाहीं. १ महिन्याच्या ठेवीवरील व्याजाचा दर १½% होता. ट्रेझरी बिलांवरील व्याजाचा दर ११ आणे ४ पै पडला. त्यापूर्वीच्या आठवड्यांत तो ११ आणे ११ पै इतका पडला होता.

### सरकारी रोखे

पैशाच्या विपुलतेचा परिणाम सरकारी रोख्यांचा बाजारभाव सुधारण्यांत झाला. ३½ टक्क्यांचे रोखे ९० रु. २ आण्यांस खरीदले-विकले गेले. अल्प मुदतीनें ज्यांची फरतफेड व्हावयाची, अशा रोख्यांस विशेष मागणी नव्हती. मध्यम व दीर्घ मुदतीच्या रोख्यांची खरेदी-विक्री थोडी अधिक झाली.

### सोनें-चांदी

अमेरिकेंतून चांदीची आयात झाल्यामुळें तिचा साठा थोडा वाढला आहे. सबंद आठवडाभर चांदीचे भाव स्थिर राहिले. सर्वांत महाग म्हणजे ६१ रु. ६ आ. व सर्वांत स्वस्त म्हणजे ६१ रु. २ आ. ह्या दरानें चांदीची विक्री झाली. सोन्याचा भाव टिकून राहिला, ह्याचें कारण सॉव्हरिनला आलेली मागणी व कांहीं सोन्याची झालेली निर्गत हें होय. सोन्याचा भाव ४१ रु. १२ च्या आसपास होता.

## युद्धविषयक धोका

### संरक्षणासाठी सक्तीच्या विम्याची योजना

हिंदुस्थान सरकारनें युद्धविषयक धोक्याचा विमा उतरविण्याची एक योजना अंमलांत आणण्याचें ठरविलें आहे. २०हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीच्या मालाचा साठा असणाऱ्या, जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणच्या व्यापाऱ्यांस ह्या साठ्याचा वरील योजनेप्रमाणें सक्तीनें विमा उतरावा लागेल. सरकार हेंच विम्याची जोखीम पत्करणार आहे. दरमहा दर शेकडा अर्धा आणा, असा हप्त्याचा दर आहे तो तीन महिने अंमलांत राहील व नंतर परिस्थितीस अनुसरून आवश्यक वाटल्यास बदलला जाईल. ह्या संबंधांतील ऑर्डिनन्स २६ ऑगस्ट रोजीं काढण्यांत आला आहे. २० हजार रुपयांपेक्षा कमी किंमतीच्या मालाचा साठा ज्यांचेजवळ आहे, अशा व्यापाऱ्यांसहि ह्या योजनेचा कांहीं अटींवर फायदा घेतां येईल. हिंदी संस्थानांस विम्याची सक्ति लागू नाहीं. ह्या वॉर रिस्क इन्शुअरन्सच्या विमा-पत्रकांस स्टँप ड्यूटीची माफी देण्यांत येईल असें समजतें.

### दिल्ली येथें युद्ध-सामुग्री पुरवठा परिषद

ब्रिटिश साम्राज्यांतल्या एशियांतील देशांच्या सरकारी प्रतिनिधींची परिषद दिल्ली येथें येत्या ऑक्टोबरांत भरावयाची आहे. युद्धसामुग्रीच्या पुरवठ्याची एकसूत्री व सुसंगत व्यवस्था करण्याच्या योजनेचा विचार तीमध्यें व्हावयाचा आहे.

### ट्रेझरी बिलांवर ११ आणे ११ पै व्याजाचा दर

हिंदी रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें गेल्या आठवड्यांत विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ११ आ. ११ पै इतका पडला.


स्पृहणीय यश

बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक-दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलूएल. बी. मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, दरल प्रॉडक्टस कंपनी लिमिटेड

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो

बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा दलाल स्ट्रीट, कोट — पुणें शाखा डेक्कन जिमखाना




एजंटः—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्नमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति तयार झाली.

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः--( १ ) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.